**महाराष्ट्र शासन**
गृह (परिवहन)विभाग,
मंत्रालय (मुख्य इमारत), २ रा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२
दूरध्वनी क्र. ०२२-२२०२५३५६ Email ID: home_transport5@maharashtra.gov.in

(ख) दू/७

---

क्र.आरएलवाय-०३२३/प्र.क्र.५६/परि-५ दिनांक : २ ऑगस्ट, २०२३

प्रति,

प्रधान सचिव,
(विधान सभा),
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
मुंबई.

विषय :नॅशनल हाय स्पीड रेल कॉर्पोरेशन लि. या उपक्रमाचे यापूर्वीचे (१ला- ५वा) वार्षिक अहवाल विधानमंडळाच्या पटलावर न ठेवण्याबाबत कारणमिमांसा सादर करणेबाबत.

महोदय,

कंपनी कायदा,२०१३ चे कलम ३९४ (२) नुसार, नॅशनल हाय स्पीड रेल कॉर्पोरेशन लि. या उपक्रमाचा सन २०२१-२२ चा ६ वा वार्षिक अहवाल विधानमंडळाच्या विधानसभागृहाच्या पटलावर ठेवण्यासाठी अहवालाच्या १० प्रती (मराठी व इंग्रजी) शासनपत्र समक्रमांक दि.२८.७.२०२३ च्या पत्रासोबत पाठविण्यात आलेल्या आहेत.

तथापि, नॅशनल हाय स्पीड रेल कॉर्पोरेशन लि. या उपक्रमाचे यापूर्वीचे (१ला- ५वा) वार्षिक अहवाल विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेले नाहीत. याची कारणमिमांसा पुढीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

- मुंबई अहमदाबाद जलदगती रेल्वेमार्ग प्रकल्पाच्या विशेष उपयोजिता वाहनामध्ये महाराष्ट्र शासनाचे २५ टक्के भागभांडवल घेण्यास राज्यशासनाची मान्यता देण्याबाबतचा शासन निर्णय दि.१२.९.२०१७ रोजी निर्गमित करण्यात आलेला आहे.
- मुंबई अहमदाबाद अतिजलद गती रेल्वेमार्ग प्रकल्प विशेष उपयोजिता वाहन या प्रकल्पाचे प्राधिकृत भागभांडवल रुपये २०,००० कोटी आहे. त्यामध्ये केंद्र शासनाचा हिस्सा (५० टक्के) रुपये १०,००० कोटी, महाराष्ट्र राज्याचा हिस्सा (२५ टक्के) रुपये ५,००० कोटी व गुजरात राज्याचा हिस्सा (२५ टक्के) रुपये ५,००० कोटी आहे.
- सदर प्रकल्पासाठी सन २०२२-२३ या आर्थिक वर्षासाठी रुपये ६ कोटी निधी दि.८.८.२०२२ च्या शासन निर्णयान्वये वितरित करण्यात आलेला आहे व त्यानंतर महाराष्ट्र राज्य नॅशनल हाय स्पीड रेल कॉर्पोरेशन लि. या उपक्रमामध्ये भागीदार (Shareholder) झालेले आहे. कंपनी कायदा,२०१३ चे कलम ३९४ च्या कलम (२) मधील तरतुदींनुसार राज्य शासन भागीदार झाल्यानंतर म्हणजेच दि.८.८.२०२२ नंतर दि.२२.१२.२०२२ रोजी पार पडलेल्या पहिल्या (एकूण ६ व्या) वार्षिक सर्वसाधारण सभेचा अहवाल विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात येत आहे.
- नॅशनल हाय स्पीड रेल कॉर्पोरेशन लि. या उपक्रमाचे १ ते ५वे वार्षिक अहवाल संसदेच्या दोन्ही सभागृहामध्ये सादर करण्यात आलेले आहेत.

आपला,

(स्वाक्षरी)

( सिध्दार्थ खरात )
सह सचिव, महाराष्ट्र शासन

सोबत- दि.१२.९.२०१७ व दि.८.८.२०२२ रोजीचे शासन निर्णय

मुंबई-अहमदाबाद जलदगती रेल्वेमार्ग प्रकल्पाच्या विशेष उपयोजिता वाहनामध्ये महाराष्ट्र शासनाचे २५% भागभांडवल घेण्यास राज्य शासनाची मान्यता देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन

गृह विभाग (परिवहन)

शासन निर्णय क्र. आरएलवाय २०१४ / ९५ / प्र.क्र. ३१ / रेल्वे कक्ष,

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

दि.१२.९.२०१७

प्रस्तावना-

१. मुंबई-अहमदाबाद जलदगती रेल्वेमार्ग प्रकल्पास केंद्रीय मंत्रिमंडळाच्या आर्थिक व्यवहार समितीने मान्यता दिली आहे. प्रकल्पाची अंदाजित किंमत रु.१ लाख ८ हजार कोटी आहे. प्रकल्पास जपान सरकारने ०.१% व्याज दराने ५० वर्षाच्या दीर्घकालीन कर्ज उपलब्ध केले आहे. प्रकल्प उभारणीकरीता रेल्वे मंत्रालय (५०%), महाराष्ट्र शासन (२५%) व गुजरात शासन (२५%) यांचे समभाग असलेल्या विशेष उपयोजिता वाहनाची स्थापना प्रस्तावित आहे. विशेष उपयोजिता वाहनाचे प्राधिकृत भाग भांडवल रु.२०,००० कोटी आहे. त्यामधील राज्य शासनाचा हिस्सा रु.५००० कोटी आहे. प्रारंभिक भरणा करावयाचे भांडवल रु.५०० कोटी व त्यातील राज्य शासनाचा हिस्सा रु.१२५ कोटी आहे.

२. बीकेसी येथील एमएमआरडीएच्या भुखंडावर रेल्वे मंत्रालयाने मुंबईतील स्थानकासाठी प्रस्ताव दिला आहे. तथापि, सदर भुखंडावर आंतरराष्ट्रीय वित्तीय सेवा केंद्राचे नियोजन असल्याने राज्य शासनाने बीकेसी व धारावी येथील २ पर्यायी भुखंड स्थानकाकरीता सुचविले आहेत व त्याकरीता राज्य शासन आग्रही आहे.

३. प्रकल्पामुळे मुंबई शहरात व राज्यात देशातील पहिला जलदगती रेल्वेमार्ग प्रकल्प अस्तित्वात येणार आहे. गाड्यांची प्रस्तावित गती ३२० ते ३५० कि.मी प्रती तास असेल. प्रकल्प उभारणीचा कालावधी ७ वर्षे आहे. प्रकल्पाच्या ५०८ कि.मी. पैकी सुमारे १२० कि.मी. राज्यात आहे. प्रस्तावित १२ स्थानकांपैकी ४ स्थानके राज्यात आहेत. प्रकल्पामुळे मुंबई व अहमदाबाद मधील रेल्वे प्रवासाचा वेळ ६ तासांवरुन २ ते २.३० तासांवर येईल. मुंबई शहराखेरीज ठाणे, वसई-विरार, बोईसर-तारापूर-पालघर पट्यातील प्रवाशांना तसेच उद्योग जगतास प्रकल्पाचा थेट लाभ मिळणार आहे. आंतरराष्ट्रीय वित्तीय सेवा केंद्र व मुंबईतील इतर प्रकल्पांकरीता सदर प्रकल्प पूरक ठरेल. नविन तंत्रज्ञानाची उपलब्धता, पायाभूत सुविधांमधील गुंतवणुक, कर्ब वायु उत्सर्जनावर नियंत्रण या दृष्टीनेही प्रकल्प राज्याकरीता

लाभदायी ठरणार आहे. मुंबई शहरास आंतरराष्ट्रीय दर्जाचे महत्वाचे शहर म्हणून विकसित करण्याच्या दृष्टीने हा प्रकल्प आवश्यक आहे.

४. उपरोक्त पार्श्वभूमीवर विशेष उपयोजिता वाहनामध्ये २५% सहभाग घेण्याची आणि सुयोग्य जमीन प्रकल्पाच्या स्थानकाकरीता उपलब्ध करुन देण्याची बाब राज्य शासनाच्या विचाराधीन होती. त्या अनुषंगाने, दि.७.९.२०१७ रोजी मा.मंत्रिमंडळ बैठकीत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले आहेत.

**शासन निर्णय-**

१. मुंबई-अहमदाबाद जलदगती रेल्वेमार्ग प्रकल्पाच्या प्रस्तावित विशेष उपयोजिता वाहनामध्ये २५% समभाग खरेदीस राज्य शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. राज्य शासनाने मुंबईतील स्थानकाकरीता बीकेसीमध्येच सुचविलेल्या पर्यायी जमिनीची व्यवहार्यता रेल्वे मंत्रालयाने प्रथमत: तपासून पहावी व त्याच जमिनीला प्राधान्य द्यावे. मात्र तांत्रिकदृष्ट्या ही जमीन अव्यवहार्य आढळल्यास खालील पर्यायांना मान्यता देण्यात येत आहे -

२.१ रेल्वे स्थानकाच्या बांधकामाचा विपरीत परिणाम आंतरराष्ट्रीय वित्तीय सेवा केंद्र प्रकल्पाच्या बांधकामावर व आर्थिक व्यवहार्यतेवर होणार नाही या तसेच इतर सुयोग्य अटी व शर्तीवर बीकेसी येथील ०.९ हेक्टर जमीन प्रस्तावित स्थानकाकरीता एमएमआरडीएद्वारे उपलब्ध करण्यास मान्यता देण्यात यावी.

२.२ एमएमआरडीएव्दारे बीकेसी येथील ०.९ हेक्टर जमीनीचे मूल्य शासनाच्या प्रकल्पातील समभाग मूल्यात अंर्तभूत करण्यास मान्यता देण्यात यावी.

२.३ रेल्वे स्थानकामध्ये प्रवेश, निकास व वायुवीजन यंत्रणेकरीता बीकेसी येथील भूपृष्ठावरील ०.९ हेक्टर जमीन प्रस्तावित स्थानकाकरीता एमएमआरडीएने उपलब्ध करुन द्यावी.

२.४ शासनाच्या हिश्याचे रु.१२५ कोटी प्रारंभिक भागभांडवल बीकेसी येथील जमिनीच्या मुल्याद्वारे समायोजित करण्यात यावे.

२.५ एमएमआरडीएच्या जमिनीचे उर्वरित मूल्य शासनाच्या समभाग मुल्यापोटी टप्प्याटप्प्याने समायोजित करण्यात यावे.

३. शासनाच्या समभाग मूल्याची रु.५००० कोटीपैकी उर्वरित रक्कम टप्प्याटप्प्याने निधीच्या उपलब्धतेनुसार रेल्वे मंत्रालयास अदा करावी.

४. सदर प्रयोजनाकरीता येणारा खर्च गृह विभाग मागणी क्र.बी-१०, ५००२ भारतीय रेल्वे यावरील भांडवली खर्च (व्यावसायिक मार्ग), १९०, शासनाच्या व्यावसायिक उपक्रमाकरीता गुंतवणूक (इतर सार्वजनिक क्षेत्र) (०१)(०१) ५००२००१४ या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

५. सदर शासन निर्णय नियोजन विभाग अनौपचारिक संदर्भ क्र.३७९/१४६१, दि.७.१२.२०१६ आणि वित्त विभाग अनौपचारिक संदर्भ क्र.३४/ अर्थबळ, दि.२९.३.२०१६ आणि नगरविकास विभाग अनौपचारीक संदर्भ क्र.१०८/नवि ७, दि.१४.११.२०१६ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेताक २०१७०९१२१०३१५२४४२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Kranti B. Patil

Digitally signed by Kranti B. Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra
ou=Home Department,
postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=ff9761db1faa1460e27b4ede45e06864712590bd05d7ff12b360f63975c01‌7, cn=Kranti B. Patil
Date: 2017.09.12 11:31:37 +05'30'

( क्रांती पाटील )
कक्ष अधिकारी

प्रत -

१. मा.राज्यपाल यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
३. मा.मंत्री (परिवहन) यांचे स्वीय सहायक
४. मा.मंत्री (वित्त व नियोजन) यांचे स्वीय सहायक
५. मा.राज्यमंत्री (परिवहन) यांचे स्वीय सहायक
६. मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
७. संबंधित विभागीय सचिव (वित्त, नियोजन, परिवहन, नगरविकास विभाग)
८. आयुक्त, एमएमआरडीए
९. निवड नस्ती, परिवहन ५.

-पृ.१४

**मुंबई-अहमदाबाद अतिजलद गती रेल्वे प्रकल्पाच्या विशेष उपयोजिता वाहनामध्ये राज्य शासनाच्या हिश्श्याचे समभाग खरेदीकरिता रु. ६ कोटी इतका निधी वितरीत करण्याबाबत.**

# महाराष्ट्र शासन
## गृह विभाग
### शासन निर्णय क्र.आरएलवाय-०५२२/प्र.क्र.१४४/परिवहन-५

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ८ ऑगस्ट, २०२२.

<u>वाचा :</u> गृह विभाग, शासन निर्णय क्र.आरएलवाय-२०१४/९५/प्र.क्र.३१/रेल्वे कक्ष, दिनांक : १२ सप्टेंबर, २०१७

**<u>प्रस्तावना :</u>**

मुंबई-अहमदाबाद अतिजलद गती रेल्वे मार्ग प्रकल्पाच्या विशेष उपयोजिता वाहनामध्ये महाराष्ट्र शासनाचे २५% समभाग खरेदीस दिनांक १२.०९.२०१७ च्या शासन निर्णयान्वये राज्य शासनाची मान्यता देण्यात आली आहे. विशेष उपयोजिता वाहनाचे भागभांडवल रु.२०,००० कोटी इतके आहे. त्यामध्ये केंद्र शासनाचा हिस्सा (५०%) रु.१०,००० कोटी, महाराष्ट्र राज्याचा हिस्सा (२५%) रु.५००० कोटी व गुजरात राज्याचा हिस्सा (२५%) रु.५००० कोटी इतका आहे. दिनांक १२.०४.२०२२ रोजी प्रगती प्रकल्प आढावा बैठकीत सह सचिव (उद्योग मंत्रालय), केंद्र सरकार यांनी मुंबई-अहमदाबाद अतिजलद गती रेल्वे मार्ग प्रकल्पासाठी निधी वितरित करण्याचे निदेश दिले आहेत. सदर निदेशानुसार मुंबई-अहमदाबाद अतिजलद गती रेल्वे मार्ग प्रकल्पाच्या विशेष उपयोजिता वाहनाचे भागभांडवलातील राज्य हिश्श्याचे समभाग खरेदी करण्यासाठी रू. ६ कोटी इतका निधी वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय :</u>**

मुंबई-अहमदाबाद अतिजलद गती रेल्वे मार्ग प्रकल्पाच्या विशेष उपयोजिता वाहनाचे भागभांडवलातील राज्य हिश्श्याचे समभाग खरेदी करण्यासाठी राष्ट्रीय जलद गती रेल्वे महामंडळ लि. (National High Speed Rail Corporation Ltd) यांना रु.६ कोटी (रुपये सहा कोटी फक्त) इतका निधी वितरित करण्यास राज्य शासन या शासन निर्णयाव्दारे मंजूरी देत आहे.

२. शासनाने सह सचिव/उप सचिव (अर्थसंकल्प), गृह विभाग यांना नियंत्रण अधिकारी व शासनाचे अवर सचिव/कार्यासन अधिकारी, रोख शाखा, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित केले असून, या शासन निर्णयाव्दारे त्यांना सदर रक्कम प्रदान करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. यासाठी येणारा खर्च सन २०२२-२३ या वर्षात मागणी क्र.बी.-१०, ५००२-भारतीय रेल्वे यावरील भांडवली खर्च (व्यावसायिक मार्ग), १४-शासनाच्या व्यावसायिक उपक्रमाकरिता गुंतवणूक, १९०-शासनाच्या व्यावसायिक उपक्रमाकरिता गुंतवणूक (इतर सार्वजनिक क्षेत्र), (०१)(०१)-महाराष्ट्र लोहमार्ग पायाभूत विकास कंपनी (५००२००१४), ३२-अंशदाने या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

४. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय, वित्त विभाग क्र.अर्थसं-२०२२/प्र.क्र.४३/अर्थ-३, दिनांक ४ एप्रिल, २०२२ सोबतच्या परिशिष्टातील अनुक्रमांक ९ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सदर देयकांन्वये आहरीत करण्यात येणा-या रक्कमेचे स्वरुप "अंशदाने" या तपशीलवार शिर्षाखाली येते. त्यानुसार तपासणी करावयाच्या सुचीत नमूद केलेल्या सर्व अटी व शर्तींचे पालन करण्यात आले आहे.

५. प्रमाणित करण्यात येते की, शासन निर्णय, वित्त विभाग क्र.अर्थसं-२०२२/प्र.क्र.४३/अर्थ-३, दिनांक ४ एप्रिल, २०२२ सोबतच्या परिशिष्टातील अनुक्रमांक ९ मधील क्रमांक १ ते १० मधील अटींची पूर्तता होत आहे.

६. सदर शासन निर्णय, नियोजन विभागाच्या सहमतीने व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.२५५/२०२२/व्यय-८, दिनांक २०.०७.२०२२ अन्वये देण्यात आलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२२०८०८११४३०३४०२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

JAYSEN JAYPRAKASH INGOLE

Digitally signed by JAYSEN JAYPRAKASH INGOLE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fac1868a3a3bc62404072a90fb604cfa54cc0c6b396bbe9f862cb814602e0bfd, pseudonym=92EF270887986A691552A8D64F666519350065AB, serialNumber=7C9E48AC69F313DEECCD6E9EECEEA57A822C9D8CCACD64DD1C5031B045E7C1F2, cn=JAYSEN JAYPRAKASH INGOLE
Date: 2022.08.08 11:47:24 +05'30'

( जयसेन जयप्रकाश इंगोले )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) महालेखापाल, १ व २ (लेखापरिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई /नागपूर.
२) मुख्य प्रकल्प व्यवस्थापक, राष्ट्रीय जलद गती रेल्वे महामंडळ लि, चेंबूर, मुंबई.
३) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
४) निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई.
५) बीयुडी-१, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) वित्त विभाग (व्यय-८/बीयुडी-११), मंत्रालय, मुंबई.
७) नियोजन विभाग, कार्यासन-१४६१, मंत्रालय, मुंबई.
८) रोख शाखा, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई यांना विनंती करण्यात येते की, सदर रक्कमेचा धनादेश National High Speed Rail Corporation Limited यांच्या नावाने काढण्यात यावा.
९) निवड नस्ती परिवहन -५